# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः09.04.2024 वारःमंगळवार

---

1.निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात 102 लोकसभा मतदारसंघात एक हजार 625 उमेदवार रिंगणात
2.विविध राज्यात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी
3.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना दिल्या गुढी पाडवा, चैत्र शुक्लादी, युगादि, संसर पाडवो आणि चेटी चंड च्या शुभेच्छा.
4.भारताच्या जीडीपीमधली वाढ चीनपेक्षा जास्त असल्याचं युरोपियन संसदीय संशोधन संस्थेतील धोरणतज्ज्ञ 'अँजेलोस डेलिव्होरियास यांचं प्रतिपादन.
आणि
5.आशिया बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून चीनमधील निंगबो इथे सुरूवात

<u>उमेदवारी अर्ज</u>

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल अखेरचा दिवस होता. या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ८ लोकसभा मतदारसंघांतील एकंदर ९५ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

<u>पंतप्रधान</u>

दरम्यान देशाच्या विविध राज्यात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रात चंद्रपूरमध्ये प्रचार सभा घेतली. महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत बोलताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली.
दिशाहीन विरोधकांकडे देशाच्या विकासासाठी कोणतीही दृष्टी नाही, विरोधक कायम विकासकामात अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात; असं सांगून ते म्हणाले की रालोआ सरकारच्या काळात महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या इतर भागातही नक्षलवाद कमी झाला असून विकासाला चालना मिळाली आहे.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, यांच्यासह महायुतीतील विविध पक्षांचे नेते, आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

<u>पंतप्रधान दौरे</u>

पंतप्रधान आज मध्यप्रदेशातील बालाघाट इथं एका सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर ते तामिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर रवाना होतील. आज चेन्नईमध्ये त्यांचा रोड शो आणि दोन जाहीर सभा होणार आहेत. उद्या ते वेल्लोरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करतील आणि त्यानंतर कोईम्बतूरजवळील मेट्टुपलायम इथं एक जाहीर सभा घेतील. तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या 39 जागांसाठी 19 एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे.

<u>पंतप्रधान</u>

भारताचा ईशान्येकडील प्रदेश हा" नवीन भारताची सर्वात मोठी यशोगाथा" म्हणून उदयास आला आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गेल्या पाच वर्षांत या प्रदेशाच्या विकासासाठी त्यांच्या सरकारनं केलेली गुंतवणूक ही काँग्रेस सरकारने दिलेल्या निधीपेक्षा जवळपास चौपट आहे असं ते म्हणाले. गेल्या दशकात झालेल्या पायाभूत विकासामुळे ईशान्य भाग देशाच्या इतर भागाशी जोडला गेला आहे. देशातलं पहिलं क्रीडा विद्यापीठ मणिपूरमध्ये उघडण्यात आलं असून सरकार आठ राज्यांमध्ये 200 हून अधिक खेलो इंडिया केंद्रे स्थापन करत आहे असं एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत मोदी यांनी सांगितलं.

<u>राहुल गांधी</u>

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल मध्य प्रदेशातील आदिवासीबहुल सिओनी आणि शहडोल इथं दोन जाहीर सभांना संबोधित करून मध्य प्रदेशातील त्यांच्या प्रचाराचा नारळ फोडला. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांचा उल्लेख करून, शेतकऱ्यांची कर्जमाफी, किमान आधारभूत किंमत लागू करणे, महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना वार्षिक 1 लाख रुपये देणे आणि तरुणांसाठी प्रशिक्षणार्थी योजना सुरू करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. काँग्रेस सरकार अग्निवीर योजना बंद करणार असल्याचं त्यांनी सांगितलं तसंच कंत्राटी नोकरीची पद्धत हटवण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

<u>गुढीपाडवा</u>

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात आजची चैत्र शुद्ध प्रतिपदा; गुढी पाडवा, चैत्र शुक्लादी, युगादि, संसर पाडवो, चेटी चंड, नवरेह आणि साजिबू चैराओबा अशा नावांनी साजरी केली जात आहे. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या विविध भागात साजरे होणारे हे सण शांतता, सौहार्द आणि सहिष्णुतेचा संदेश देतात असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनीही गुढीपाडवा तसेच मराठी नूतन वर्षानिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

साडेतीन मुहुर्तांपैकी एक उत्तम मुहूर्त मानल्या जाणाऱ्या गुढी पाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सर सुरू होते. घरोघरी गुढ्या उभारून, तोरणे लावून नवीन वर्षांचं स्वागत केलं जातं. अनेकजण गुढी पाडव्याला नवीन उद्योग, व्यवसायाची सुरुवात करतात.

**भारतचीन**

भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजेच जीडीपी मधली वाढ चीनपेक्षा जास्त असल्याचं युरोपियन संसदीय संशोधन संस्थेतील धोरण तज्ञ 'अँजेलोस डेलिव्होरियास' यांनी म्हटलं आहे. आगामी काळातही भारताचा जीडीपी चीनच्या पुढे राहील. गेल्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेच्या सातत्यपूर्ण विकासाकडे लक्ष वेधताना, भारताची जीडीपी वाढ चीनपेक्षा जास्त असणे हे जागतिक क्षेत्रामध्ये नवी दिल्ली एक मजबूत आर्थिक शक्तीस्थान म्हणून उदयाला आल्याचं दर्शवत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. 2023 मध्ये भारताची जीडीपी वाढ साडेसात टक्क्यांहून अधिक होती, तर चीनची जीडीपी वाढ 5 पूर्णांक 2 टक्के होती. 2026 पर्यंत भारताचा जीडीपी 7 टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असून चीनचा जीडीपी साडेचार टक्क्यांवर जणायची अपेक्षा आहे. चीनचा 2024 मधील विकास दर 4.6 टक्के असेल, आणि 2028 मध्ये तो 3.5 टक्क्यांपर्यंत घसरेल.

**केजरीवाल**

सक्तवसुली संचालनालयानं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक बिभव कुमार आणि आपचे आमदार दुर्गेश पाठक यांची, अबकारी धोरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात चौकशी सुरु केली आहे. वर्ष 2021-22 मधील गोवा विधानसभा निवडणुकीसाठी आपच्या प्रचारासंदर्भात पाठक यांची चौकशी करण्यात आली. दक्षिणेकडील एका गटानं दिलेल्या 100 कोटी रुपयांपैकी सुमारे 45 कोटी रुपयांची लाच 'आप' नं गोवा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी वापरली होती असा सक्तवसुली संचालनालयाचा आरोप आहे.

**सूर्यग्रहण**

या वर्षातलं पहिलं खग्रास सूर्यग्रहण मेक्सिकोतील माझाटेन शहरात सर्वात आधी दिसलं. मेक्सिकोच्या स्थानिक वेळेनुसार सकाळी 11 वाजून 7 मिनिटांनी सूर्यग्रहण झालं त्यामुळे मेक्सिकोचा पॅसिफिक किनारा काही काळ पूर्णपणे अंधारात बुडाला. भारत वगळता हे सूर्यग्रहण मेक्सिको, उत्तर अमेरिका, कॅनडा, जमैका, आयर्लंड, इंग्लंडचा वायव्य प्रदेश, क्युबा, डॉमिनिका, कोस्टा रिका, पश्चिम युरोप, फ्रेंच पॉलिनेशिया, पॅसिफिक, अटलांटिक आणि आर्क्टिकमध्येही पाहता आलं. भारतीय वेळेनुसार, काल रात्री 9 वाजून 12 मिनिटांनी ग्रहण सुरू झालं आणि रात्री 2 वाजून 22 मिनिटांनी ते संपलं. ग्रहणाचा एकूण कालावधी 5 तास 10 मिनिटे होता. यादरम्यान 4 मिनिटे 11 सेकंद आकाशात पूर्ण अंधार होता.

**पाकिस्तान**

पाकिस्तानात सिनेटचे नवीन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडण्यासाठी तसंच नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीसाठी अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी संसदेच्या वरिष्ठ सभागृहाची बैठक बोलावली आहे. खैबर पख्तूनख्वा सिनेट निवडणुकीचे निकाल बाकी असतानाच हे अधिवेशन होत आहे.

**इस्रायल लेबनॉन हल्ला**

इस्रायलनं दक्षिण लेबनॉनमध्ये काल केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल्लाचा एक कमांडर अली अहमद हुसेन याला ठार झाल्याचा दावा इस्रायलच्या संरक्षण दलानं केला आहे. इस्रायल आणि पॅलेस्टिनी दहशतवादी गट हमास यांच्यात गेल्या वर्षी 7 ऑक्टोबर रोजी युद्ध सुरू झाल्यापासून हुसेननं लेबनॉनमधून इस्रायली प्रदेशावर अनेक क्षेपणास्त्रांचा मारा केला होता असं इस्रायलच्या लष्करी निवेदनात म्हटलं आहे.

**हल्ला**

काश्मीर खोऱ्यात दक्षिण काश्मीरमधल्या शोपियान जिल्ह्यात - हीरपोरा भागात काल, संध्याकाळी दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात एक टॅक्सी चालक जखमी झाला. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी या दहशतवादी कृत्यात सामील असलेल्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी शोध मोहीम सुरू केली असल्याचं पोलिस प्रवक्त्यानं सांगितलं. अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे.

**बॅडमिंटन**

यंदाची आशिया बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा आजपासून चीनमधील निंगबो इथे सुरू होणार असून; यामध्ये एचएस प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत, लक्ष्य सेन, पीव्ही सिंधू आणि अन्य निष्णात बॅडमिंटनपटू भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करतील. पुरुष एकेरीत एच एस प्रणॉयची चीनच्या लू ग्वानझूशी लढत होईल तर किदाम्बी श्रीकांतची पहिल्या फेरीत इंडोनेशियाच्या अँथनी गिनटिंगशी लढत होईल. दरम्यान, पहिल्या फेरीत लक्ष्य सेनचा सामना अव्वल मानांकित शी यू क्यूशी होईल. भारताचा प्रियांशु राजावत पहिल्या फेरीत मलेशियाच्या ली झी सोबत सामना खेळेल. महिला एकेरीत पहिल्या फेरीत पी व्ही सिंधूचा सामना मलेशियाच्या गोह जिन वेईशी होईल. 14 एप्रिलला या स्पर्धेचा समारोप होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार.